# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २६३/०८, २६४/०८, २७१/०८ दिनांक :

**<u>ग्राहक तक्रार क्र. २६३</u>**

श्री. हेरलगे महावीर जिनाप्पा,
हेरलगे मळा, जुना चंदूर रोड, अर्जदार
इचलकरंजी, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर

**<u>ग्राहक तक्रार क्र. २६४/२००८</u>**

श्री. गुळगी कल्याणी रायाप्पा,
घ.नं. ४६२/४७१, भोजे मळा, अर्जदार
इचलकरंजी, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर

**<u>ग्राहक तक्रार क्र. २७१/२००८</u>**

श्री. मुल्ला आल्ताफ बाबासाहेब,
जुना चंदूर रोड, इचलकरंजी
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंड्ल कार्यालय, ताराबाई पार्क,
<u>कोल्हापूर.</u>

२) कार्यकारी अभियंता(संवसु)
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
सं.व सु विभाग, इचलकरंजी.
जि. कोल्हापूर.

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
अ उप विभाग, इचलकरंजी.

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८:२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्यायनिर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे दिनांक १९.१.२००९

सदरील तिन्ही अर्ज हे इचलकरंजी येथील पॉवरलूम करिता विद्युत पुरवठा करणे संबंधात आहेत. तिन्ही अर्जदारांनी डिसेंबर २००७ मध्ये अ उप विभाग इचलकरंजी यांचेकडे विद्युत पुरवठा मिळणे बाबतची मागणी केली होती. परंतु त्यांचे म्हणणे की, तदनंतर अद्याप पर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी केवळ ट्रान्स्फॉर्मरवर लोड शिल्लक नाही, नवीन ट्रान्स्फॉर्मर सेंटर व लाईनचे काम पूर्ण झालेले नाही या सबबीवर अद्यापपर्यंत विद्युत पुरवठा केलेला नाही. तसेच अर्जाप्रमाणे विद्युत पुरवठा देण्याबाबत मागणी होऊन देखील खर्चाचा तपशील (कोटेशन) दिलेला नाही. सबब प्रत्येक अर्जदाराने त्यांना सत्वर विद्युत पुरवठा मिळावा या बाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे अर्ज दाखल केला. वरील तिन्ही अर्जदारांचे अर्ज अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने मंजूर केले. त्यामध्ये नवीन रोहित्राचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी विभागीय कार्यालय, इचलकरंजी यांचेकडे १ आठवड्याचे आत सादर करणे बाबत आदेश दिले व त्याप्रमाणे नवीन रोहित्रावरुन लवकरांत लवकर विद्युत पुरवठा करणे बाबत आदेश दिला. सदरचे आदेश नोव्हेंबर २००८ मधील आहेत. तदनंतरही संबधित अधिकाऱ्यांनी त्या आदेशाची पूर्तता केली नाही व योग्य कारणही दिले नसलेने त्या आदेशा विरुध्द या मंचाकडे अ नमुन्यामध्ये अपील दाखल केले. तिन्हीही अर्जदारांचे म्हणणे की, त्यांचे पुढील नुकसान टाळणेसाठी तातडीने विद्युत पुरवठा मिळणे बाबत आदेश व्हावेत.

सदरील तिन्ही प्रकरणांमध्ये वि.प.स आपले म्हणणे सादर करण्याची संधी दिली. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, इचलकरंजी यांचेकडून म्हणणे सादर करण्यात आले. त्या म्हणण्याप्रमाणे संबंधित अर्जदारांचे विद्युत पुरवठ्या बाबत सर्व्हेक्षण व मंजुरीसाठी तांत्रिक अहवाल उप विभाग कार्यालयाकडून मागविला होता. त्याप्रमाणे संबंधित रोहित्रावरुन अर्जदारास विद्युत पुरवठा करणे बाबत विद्युत भार शिल्लक नसल्याचे कळविण्यात आले आहे. अस्तित्वात असलेल्या रोहित्राची क्षमता वाढविणे बाबत अंदाजपत्रक मंजुरीसाठी विभागीय कार्यालय, इचलकरंजी यांचेकडे पाठविले होते. तसेच इचलकरंजी विभागामध्ये सद्याचे ग्राहकांसाठी व पुढे अपेक्षित असणाऱ्या ग्राहकांबाबत नवीन जनित्र उभारण्या बाबत अहवाल संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला होता. तसेच अंतर्गत तक्रार निवारण कक्षा कडील आदेशा प्रमाणे अर्जदारांना विद्युत पुरवठा करणे बाबत जरुर ते रोहित्र बसविणेसाठी अंदाजपत्रक तयार करुन खर्चास मान्यता घेण्याबाबत कळविण्यात आले होते. अशी मंजुरी संदर्भ पत्र क्र. ३६५४ दिनांक ३.१२.२००८ अन्वये मागितली होती. त्याप्रमाणे एकूण १३७ रोहित्रांची तरतूद करण्यात आली असून त्या बाबतची मंजुरी मिळालेली आहे. परिणामी, नवीन योजना मंजुरी प्राप्त झालेने नवीन रोहित्राचे अंदाजपत्रक त्वरीत मंजूर करुन ग्राहकास नवीन कनेक्शन मंजूर करण्यात येईल असे त्यांचे म्हणणे आहे. आज दिनांक १९.१.२००९ रोजी तिन्ही अर्जदार तसेच वि.प.तर्फे श्री. पी.व्ही. कांबळे, नोडल ऑफीसर तथा कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय, कोल्हापूर, श्री. एस.आर. कांबळे, कार्यकारी अभियंता, इचलकरंजी विभाग, श्री. शिंदे, उप कार्यकारी अभियंता, ब उप विभाग, श्री. सुर्यवंशी, उप कार्यकारी अभियंता, अ उप विभाग हे हजर होते.

दोन्ही पक्षकारांनी आपआपले म्हणणे मंचासमोर सादर केले. मंचाच्या तिन्ही सदस्यांनी अर्जदारांचे मूळ अर्ज पहाता, तिन्ही अर्जदारांनी विद्युत पुरवठा तात्काळ मिळणे बाबत मागणी केली आहे मात्र कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईची मागणी केलेली नाही. तसेच आज दि. १९.१.२००९ रोजी वि.प.तर्फे सादर केलेल्या म्हणण्याप्रमाणे संबंधित नवीन रोहित्रासाठी जरुर ती मान्यता झाली आहे व अंदाजपत्रक मंजूर करुन अंमलबजावणी लवकर होवू शकेल असे सांगण्यात आले.

परिणामी, या मंचाने या सर्व बाबींचा विचार करता, प्रथम प्रत्येक अर्जदारास त्यांचे खर्चाबाबत वि.प.ने ८ दिवसामध्ये कळविणे आवश्यक आहे असे मंचास वाटते. तसेच नवीन रोहित्र बसविण्याचे असल्याने व त्याकामी जरुर ती तांत्रिक बाबींची पूर्तता विभागीय कार्यालयाकडून झालेली असलेने अंमलबजावणीसाठी कांही मुदत घालून प्रत्येक अर्जदारास त्यांनी विद्युत पुरवठ्यासाठी वि.प.च्या नियमांची पूर्तता केलेनंतर कांही ठराविक कालावधी नंतर विद्युत पुरवठा देण्या बाबत आदेश देणे या मंचास क्रमप्राप्त वाटते. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

१) अर्जदार क्र. २६३, २६४ व २७१ यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

२) वि.प. यांनी या निकालाची नक्कल प्राप्त झालेपासून ८ दिवसांत प्रत्येक अर्जदारास त्यांनी विद्युत पुरवठ्यासाठी करावयाच्या खर्चाबाबत (कोटेशन) लेखी कळविण्यात यावे.

३) वरील प्रमाणे पूर्तता झालेनंतर प्रत्येक अर्जदाराने नियमाप्रमाणे वि.प.च्या अटींची पूर्तता करणेच्या अटीवर कोटेशनची रक्कम भरल्यापासून ३ महिन्यापर्यंत वि.प.तर्फे प्रत्येक अर्जदारास त्यांनी केलेल्या मागणी प्रमाणे विद्युत पुरवठा करण्यात यावा.

४) खर्चाबाबत आदेश नाही

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १९.१.२००९

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..